CMYK

बीड । सोमवार
१७.०३.२०२५
वर्षे : ४ अंक : ३३८
किंमत : ३ रु. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र
■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955



आज संकष्ट चतुर्थी
चंद्रोदय ०९:११ मी.


निधड्या छातीचा, दणकट कणांचा, मराठी मनांचा, भारत भूमीचा एकच राजा, छत्रपती शिवाजी महाराज यांना मानाचा मुजरा... **शिवजयंतीच्या हार्दिक शुभेच्छा!**

# आनंदी आनंद गडे... सुनीता विल्यम्सच्या चेहऱ्यावर उमललं हसू, अंतराळातून आला VIDEO

**वृत्तसंस्था**

अंतराळात अडकून पडलेल्या अंतराळवीर सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर यांच्यासाठी आज दिवस खास ठरला. नासा आणि स्पेसएक्सचे क्रू- १० मिशन सध्या आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात (ISS ) आहे. क्रू- १० मोहिमेतील अंतराळवीर फाल्कन ९ रॉकेटद्वारे ड्रॅगन अंतराळयानातून खडड वर पोहोचले. यशस्वीरित्या डॉकिंग आणि हॅच उघडल्यानंतर, अंतराळवीर सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर यांना भेटले. या भेटीचे फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत.क्रू ड्रॅगन अंतराळयान स्थानिक वेळेनुसार सकाळी ९.४० वाजता फाल्कन ९ रॉकेटने ISS वर पोहोचले. क्रू- १० संघात अमेरिकेचे दोन अंतराळवीर अँन मॅकक्लेलन आणि निकोल आयर्स, जपानी अंतराळवीर तुकुया ओनिशी आणि रशियाचे किरिल पेस्कोव्ह यांचा समावेश आहे. डॉकिंगनंतर क्रू- १० सदस्य सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर यांना भेटले. यादरम्यान, सुनीता आणि विल्मोर यांच्या चेहऱ्यावरील आनंद स्पष्टपणे दिसून होता. ते त्यांच्या सहकारी अंतराळवीरांना पाहून जल्लोष करताना आणि मजा करताना दिसले. त्यांनी सर्वांना मिठी मारून आपला आनंद व्यक्त केला. सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर पुढील काही दिवस नवीन अंतराळवीरांना स्टेशनबद्दल माहिती देणार आहेत. या आठवड्याच्या अखेरीस, सुनीता आणि विल्मोर हे स्पेसएक्स कॅप्सूलद्वारे पृथ्वीवर रवाना होतील अशी अपेक्षा आहे. नासाच्या मते, हवामान अनुकूल असल्यास, स्पेसएक्स कॅप्सूल बुधवारपूर्वी अंतराळ स्थानकापासून वेगळे होऊ शकेल आणि फ्लोरिडाच्या किनाऱ्यावर उतरेल. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आरोप केला होता की, बायडेन यांनी सुनीता आणि बुच विल्मोर यांना अंतराळात सोडले. यानंतर, मस्क यांची कंपनी स्पेसएक्सने या दिशेने काम सुरू केले. तांत्रिक कारणांमुळे उशीर झालयानंतर अखेर क्रू- १० चे प्रक्षेपण १५ मार्च रोजी करण्यात आले आणि आज ते अंतराळात पोहोचले.






# नागरगोजे आत्महत्या प्रकरणी गुन्हाची नोंद नाही!

**बीड । प्रतिनिधी**



बीड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष विक्रम मुंडे यांच्या संस्थेतील शिक्षक धनंजय नागरगोजे याने संस्थाचालकांच्या त्रासाला कंटाळून आत्महत्या केली. मात्र चोवीस तास उलटले तरीही या प्रकरणात गुन्हा दाखल झालेला नाही. कोणाची तक्रार नसल्याने गुन्हा दाखल करण्यात आळा नसल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. याबाबत सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांच्याशि चर्चा केली आहे.

धुळवडीच्या दिवशी एका शिक्षकाने बँकेच्या बाहेर फाशी घेऊन, स्वत:ला संपवलं. धनंजय अभिमान नागरगोजे या ३० वर्षीय शिक्षकाने स्वत:चं आयुष्य संपवताना लिहिलेल्या पोस्टमध्ये आरोपींच्या नावाचाही उल्लेख केला आहे. विक्रम बाबुराव मुंडे, विजय विक्रम मुंडे, अतूल विक्रम मुंडे आणि त्यांचे कार्यकर्ते उमेश रमेश मुंडे, गोविंद नवनाथ आव्हाड, ज्ञानेश्वर राजेभाऊ मुरकुटे या सर्वांनी माझा खूप छळ लावला आहे. मला हे हालहाल करून ▶▶ उर्वरित पान २ वर

# प्रेम प्रकरणातून तरूणाला डांबून मारले

## विकास बनसोडे हत्याकांडाची धक्कादायक माहिती समोर

**बीड । प्रतिनिधी**

बीड पुन्हा एकदा हत्याकांडाच्या घटनेने हादरलं आहे. बीडच्या आष्टीतील पिंपरी घुमरीत प्रेम प्रकरणातून एका युवकाला बेदम मारहाण करण्यात आली. या मारहाणीत युवकाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. जालना जिल्ह्यातील तरुण हा आष्टीत ट्रक ड्रायव्हरचं काम करत होता. भाऊसाहेब क्षीरसागरसहित सात जणांच्या अमानुष मारहाणीत तरुणाचा जागीच मृत्यू झाला आहे. विकास बनसोडे असे मृत तरुणाचे नाव आहे. तरुणाच्या मृत्यूने महाराष्ट्रात खळबळ उडाली आहे.



बीडच्या आष्टी तालुक्यातील पिंपरी घुमरी येथे प्रेम प्रकरणातून युवकाला बेदम अमानुष मारहाण केली. या मारहाणीत युवकाचा जागीच मृत्यू झाला. तरुणाला आष्टी तालुक्यातील पिंपरी घुमरी येथे दोन दिवस झाडाला डांबून मारहाण केली. या मारहाणीत युवकाचा जागीच मृत्यू झाला आहे. युवक जालना जिल्ह्यातील असून त्याचे नाव विकास बनसोडे असं आहे. तो आष्टी तालुक्यातील पिंपरी घुमरी येथील भाऊसाहेब शिरसागरच्या ट्रक वर ड्रायव्हर म्हणून कामाला होता. मात्र त्याची भाऊसाहेब क्षीरसागर आणि इतर सात लोकांनी अमानुष मारहाण करून हत्या केल्याचे उघड झालं आहे. या प्रकरणी आष्टी पोलीस ठाण्यात ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे, अशी माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी हानकुडे यांनी दिली आहे. विकास बनसोडेचा भाऊ आकाश बनसोडेने पोलिसांत जबाब नोंदवला. या जबाबात आकाश

▶▶ उर्वरित पान २ वर

# सुरेश धस खोक्याच्या घरी, आईसह पत्नीचा आक्रोश

● **आमदारांचा वन विभागाला इशारा**

**बीड । प्रतिनिधी**

भाजपा आमदार सुरेश धस यांनी सतीश भोसले उर्फ खोक्या याच्या घरी जाऊन कुटुंबीयांची भेट घेतली. यावेळी, सुरेश धस यांना पाहताच भोसले कुटुंबीयांनी आक्रोश केल्याचे दिसून आले. सतिश भोसले याच्याकडून



करण्यात आलेल्या मारहाणीचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर पोलिसांनी त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला होता. तसेच, वन विभागाने देखील कारवाई केली होती. वन विभागाच्या कारवाईत



खोक्याचे घर जेसीबीच्या सहाय्याने पाडण्यात आले. मात्र, कोणत्या कायद्यान्वये खोक्याचे घर पाडले असा सवाल आमदार धस यांनी उपस्थित केला होता. त्यानंतर, ते आज खोक्याच्या घरी भेट देण्यासाठी गेले होते. शिरूर कासार तालुक्यात वृक्ष लागवड शून्य टक्क्यावर आल्याने हे लपवण्यासाठी वन विभागाकडून असे कृत्य करण्यात आल्याचे

▶▶ उर्वरित पान २ वर




# अजित दादा बीड जिल्ह्यातील अवैध धंदे नेस्तनाबूत करा




## माजलगावात अवैध धंदे चालवणाऱ्या बोक्यांमुळे दहशतीचे सावट

**माजलगाव । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्याचे पालक मंत्री म्हणून म हाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री असलेले आणि शब्दाचे पक्के मानले जाणारे अजित दादा पवार यांच्याकडून बीड जिल्ह्यातील जनतेला मोठ्या अपेक्षा आहेत विकासाबरोबरच जिल्ह्यावरील दहशतीचे सावट संपुष्टात येईल अशी आशा ठेवून जगणारी जनता म्हणत आहे की बीड जिल्ह्यातील अवैध धंदे यांचे समूळ उच्चाटन करतील का अजित दादा असा प्रश्न बीड जिल्ह्यातील जनतेला पडत आहे कारण अनेक अवैध धंद्यात राजकारणाचे हात उघड होत आहेत अवैध धंद्यातून पैसा आणि पैशाच्या जोरावर दहशत निर्माण करून राजकारण करणे हा बोक्याचा छंद आहे. जिल्ह्यात वाढलेले अवैध धंदे बंद झाले तर दहशत दादागिरीचा समूळ नायनाट होईल असे जाणकार बोलत आहेत.



### ● माजलगावात मटक्याचा पक्का बोका कोण ?

**माजलगाव पोलिसांना पत्रकारांचे सर्वसामान्य जनतेने तक्रारी करून मटका बंद करण्यासाठी मागणी केली आहे मात्र पोलीस याकडेच जाणिव पूर्वक दुर्लक्ष करत असल्यामुळे माजलगावात राजकारणाचा मटका किंग कोणीतरी असावा असा कयास काढत मटक्यावर बसलेला पक्का बोका कोण ?.**

दादा तुम्ही परळीचा आक्का म्हणताय माजलगाव मधला मटका बोका शोधा माजलगाव तालुक्याचे विद्यमान आमदार प्रकाश दादा सोळंके यांनी मसाजोग प्रकरणात हिरारीने भाग घेऊन त्यात असलेला परळीचा आका शोधून काढला मात्र माजलगाव तालुक्यातील मटक्यातील आर्थिक लोणी खाणारा बोका का नाही शोधला अशी चर्चा माजलगाव मध्ये जनता करत आहे तर दादा म्हणजे, दुसऱ्यांचे पाहायचे वाकून आपले ठेवायचे झाकून आशा वृत्तीचे आहेत की काय अशीही चर्चा केली जात आहे. मटका बुकी वरील माजलगाव पोलिसांची कारवाई कोमात शहरासह ग्रामीण भागात मटका जोम ात ▶▶ उर्वरित पान २ वर

दैनिक
## मराठवाडा पत्र
वर्धापन दिन

वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा...

## चतुर्थ वर्धापन दिन

**सर्वांना नमस्कार, ! तुमच्या प्रतिक्रिया आमच्यासाठी महत्त्वाच्या आहेत.**

आपले दैनिक मराठवाडा पत्र येत्या ३० मार्च २०२५ ला चार वर्ष पूर्ण करत असून पाचव्या वर्षांमध्ये पदार्पण करत आहे . गेल्या चार वर्षांत आपण सर्वांनी आम्हाला भरभरून प्रेम दिले. दैनिक मराठवाडा पत्रच्या चौथ्या वर्धापनदिनानिमित्त दिनांक ३० मार्च २०२५ ला आम्ही विशेषांक प्रकाशित करत आहोत. या विशेष अंकामध्ये तुमच्या प्रतिक्रिया आमच्या पुढील कार्यासाठी महत्त्वाच्या ठरतील.

आपणं आपल्या प्रतिक्रिया दिनांक २५ मार्च २०२५ पर्यंत खालील ई-मेल व मोबाईल नंबरवर पाठवाव्यात. दैनिकाबद्दल आपली प्रतिक्रिया व फोटो पाठवावा हि विनंती.

मो.क्र. ९८२२१५२९५५, Email-dailymarathwadapatra2021gmail.com
वरील नंबर व ई-मेलवर प्रतिक्रिया पाठवाव्यात.

CMYK

# प्रेरणादायी आहे स्वराज्याचा इतिहास; शिवजयंतीनिमित्त वाचा स्वराज्याच्या ठळक घडामोडी



छत्रपती शिवाजी महाराज हे भारतीय इतिहासातील सर्वात शूर आणि कुशल योद्ध्यांपैकी एक आहेत. ज्यांच्या शौर्याची गाथा इतिहासाच्या पानांमध्ये सुवर्णाक्षरांनी नोंदवली गेली आहे. प्रत्येक मराठा शिवाजी महाराजांचे नाव अभिमानाने घेतो. तो केवळ म हाराष्ट्रातच नाही तर संपूर्ण देशात शौर्याचे उदाहरण आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ त्यांच्या धोरणात्मक बुद्धिमत्तेसाठीच नाही, तर एका शक्तिशाली मराठा साम्राज्याचा पाया रचण्यासाठीही ओळखले जातात. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनाशी संबंधित काही रंजक कथा जाणून घेऊया.

### • शिवनेरीवर झाला जन्म

शिवाजी महाराजांचा जन्म १९ फेब्रुवारी १६३० रोजी शिवनेरी किल्ल्यावर झाला. त्यांचे वडील शहाजी भोसले हे विजापूरचे सेनापती होते. आई जिजाबाईंनी त्यांना लहानपणापासूनच धर्म, नैतिकता आणि युद्ध कौशल्ये शिकवली. रामायण आणि महाभारतातील कथा सांगून जिजाबाईंनी त्यांना एक महान योद्धा बनण्याची प्रेरणा दिली असे म्हटले जाते.

### • तोरणा किल्ल्याचा पहिला विजय

शिवाजी महाराजांनी वयाच्या १६ व्या वर्षी विजापूरचा तोरणा किल्ला जिंकला. हा त्याचा पहिला विजय होता, ज्याने त्याचे शौर्य आणि दूरदृष्टी सिद्ध केली. यानंतर त्याने इतर अनेक किल्ले जिंकले आणि मराठा साम्राज्याचा पाया घातला. विजापूरच्या सुलतानाने शिवाजी महाराजांना पराभूत करण्यासाठी अफजल खान नावाच्या एका क्रूर सेनापतीला पाठवले. त्याने शिवाजीला विश्वासघाताने मारण्याची योजना आखली आणि त्यांना भेटायला बोलावले. पण शिवाजी महाराजांना ही युक्ती आधीच कळली होती. जेव्हा अफझल खानने शिवाजीला मिठी मारण्याच्या बहाण्याने त्यांच्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्याने त्याच्या नखांसारख्या शस्त्राने त्यांना ठार मारले.

### • आग्र्यावरुन सुटका

औरंगजेबाने शिवाजी महाराजांना आग्र्याला बोलावले आणि कपटाने त्यांना कैद केले. त्यांना आग्रा किल्ल्यात कडक सुरक्षा व्यवस्थेत ठेवण्यात आले होती. पण शिवाजीने बुद्धिमत्ता आणि हुशारीने स्वतःला वाचवले. त्यांनी आजारी असल्याचे भासवले आणि मिठाईच्या पेटाऱ्यांमधून लपून पळून जाण्याचा प्लॅन केला. ही योजना अत्यंत नियोजनबद्ध आखली गेली आणि ती यशस्वीही करण्यात आली.

### • केला राज्याभिषेक

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची संकल्पना साकार केली आणि मुघल, आदिलशाह आणि पोर्तुगीजांशी लढत स्वतंत्र मराठा साम्राज्याची स्थापना केली. ६ जून १६७४ रोजी रायगड किल्ल्यावर एका भव्य समारंभात त्यांचा राज्याभिषेक करण्यात आला. ते अधिकृतपणे छत्रपती झाले आणि त्यांनी त्यांच्या राज्याचे नाव हिंदवी स्वराज ठेवले. शिवाजी महाराजांनी भारतात पहिल्यांदाच एक शक्तिशाली नौदल स्थापन केले. अरबी समुद्रात पोर्तुगीज, ब्रिटिश आणि डच सैन्याचा सामना करण्यासाठी त्याने शक्तिशाली जहाजे बांधली. म्हणूनच त्यांना भारतीय नौदलाचे जनक असेही म्हटले जाते.

### • महिला-शेतकऱ्यांचा आदर

शिवाजी महाराज नेहमीच महिलांचा आदर करायचे आणि त्यांनी आपल्या सैनिकांना महिलांच्या सन्मानाचे रक्षण करण्याचे आदेश दिले. शेतकऱ्यांचे संरक्षण करण्यासाठी त्यांनी कर प्रणालीत सुधारणा केल्या. त्यांनी कोणत्याही धार्मिक आधारावर भेदभाव केला नाही आणि सर्व धर्मांचा आदर केला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन चरीत्रातून आपल्याला अनेक प्रेरणा मिळतात.

# संकष्टी चतुर्थी 2025: अडचणी आहेत? मनोकामना अपूर्ण आहेत? गणपती बाप्पाला करा 'हे' सोप्पे उपाय

संकष्टी चतुर्थीला हिंदू धर्मात खूप महत्त्व आहे. दर महिन्याच्या कृष्ण पक्षातील चतुर्थी तिथीला संकष्टी चतुर्थी साजरी केली जाते. चैत्र महिन्यात येणाऱ्या संकष्टी चतुर्थीला भालचंद्र संकष्टी चतुर्थी म्हणतात. या दिवशी विघ्नांचा नाश करणाऱ्या गणपतीची पूजा केली जाते. विधीनुसार उपवास केला जातो. संकष्टी चतुर्थीच्या दिवशी गणपतीची पूजा आणि उपवास केल्याने जीवनातील सर्व दुःख दूर होतात अशी धार्मिक श्रद्धा आहे. याच दिवसासाठीचे काही खास उपाय आम्ही तुम्हाला सांगणार आहोत.

### • पूर्ण होतात मनोकामना

संकष्टी चतुर्थीच्या दिवशी गणपतीची पूजा आणि उपवास केल्याने जीवनातील सर्व अडथळे आणि समस्या दूर होतात. भगवान गणेशाच्या आशीर्वादाने जीवनात सुख आणि समृद्धी राहते. महिला आपल्या मुलांच्या चांगल्या आरोग्यासाठी आणि दीर्घायुष्यासाठी हे व्रत पाळतात. या दिवशी पूजेदरम्यान काही खास वस्तू अर्पण कराव्यात. असे




केल्याने सर्व प्रलंबित कामे पूर्ण होतात असे मानले जाते.

### • उद्या कधी आहे मुहूर्त

हिंदू कॅलेंडरनुसार चैत्र महिन्यातील कृष्ण पक्षातील चतुर्थी तिथी उद्या म्हणजेच १७ मार्च रोजी संध्याकाळी ७:३३ वाजता सुरू होत आहे. ही चतुर्थी तिथी दुसऱ्या दिवशी १८ मार्च रोजी रात्री १०:०९ वाजता संपेल. संकष्टी चतुर्थीच्या दिवशी चंद्रोदयाच्या वेळी पूजा केली जाते. अशा परिस्थितीत, भालचंद्र संकष्टी चतुर्थीचे व्रत उद्याच पाळले जाईल.

### • करा हे सोप्पे उपाय

१. संकष्टी चतुर्थीच्या दिवशी पूजेदरम्यान बाप्पाला बेसनाचे लाडू अर्पण करावेत. असे मानले जाते की हे भगवान गणेशाला अर्पण केल्याने करिअरमध्ये नवीन उंची मिळते. तसेच जीवनातील सर्व दुःखे निघून जातात.

२. भगवान गणेशाला मोदक खूप आवडतात, म्हणून संकष्टी चतुर्थीच्या दिवशी, पूजा करताना बाप्पाला मोदक अर्पण करावेत.

३. संकष्टी चतुर्थीच्या दिवशी गणपतीला मोतीचूरचे लाडू अर्पण करावेत. मान्यतेनुसार या दिवशी देवाला मोतीचूर लाडू अर्पण केल्याने वैवाहिक जीवन आनंदी राहते.

४. या दिवशी भगवान गणेशाला बुंदीचे लाडू देखील अर्पण करता येतात. हा भोग अर्पण केल्याने गणपतीचा आशीर्वाद मिळतो आणि घरातून नकारात्मकता दूर राहते.

# तुकाराम बीज या दिवशीच नांदुरकी वृक्ष का हलतो ?



१६ मार्च २०२५ रोजी श्रीतुकाराम बीज. या दिवशी जग्दुरु संतश्रेष्ठ श्रीतुकाराम महाराज वैकुंठगमनास निघाले.

आम्ही जातो आमच्या गावा ।
आमचा राम राम घ्यावा ।।१।।
आजवर होतो तुमच्या गावी ।
आता कृपा असू द्यावी ।।२।।
आता कसले येणे जाणे ।
सहज खुंटले बोलणे ।।३।।
रामकृष्ण विठ्ठल बोला ।
तुका गेला वैकुंठाला ।।४।

यंदाचे ३७७ वे तुकाराम बीज सोहळा आहे. यावेळी देहूनगरी वारकऱ्यांनी फुलून जाते. या दिवसाचे अनन्य साधारण महत्त्व आहे. या दिवशी आजही नांदुरकी हे वृक्ष हलतं असं म्हटलं जातं. काय आहे यामागची आख्यायिका.

तुकाराम बीजेचा सोहळा याचि डोळा पाहायला लाखो वारकऱ्यांनी देहूनगरीत एकच गर्दी केली आहे. तुकाराम बीज सोहळाच्या दिवशी मंदिरातील परिसरातील एक झाड थरारतं अशी आख्यायिका आहे. त्यामुळे तुकोबायांच्या दर्शनासोबत नांदुरकी झाडाचं दर्शन वारकरी घेतात.

काय आहे तुकाराम बीज सोहळा ?

पौराणिक आख्यायिकानुसार तुकोबायांनी सम ाजातील अनिष्ट रुढी परंपरेबद्दल कीर्तनाच्या माध्याम ातून टीका केली होती. तुकोबायांच्या या टीकेनंतर विठूरायांना दर्शन देणे भाग पडलं. तेव्हा तुकोबांनी विठ्ठलाला तुझ्या पायाशी सेवा घडावी असा आग्रह धरला. त्यानंतर विठूरायानी तुकोबांसाठी रथ पाठवला आणि त्यानंतर तुकोबांनी 'आम्ही जातो अमुच्या गावा अमुचा, रामराम घ्यावा' असं म्हणतं देहू नगरी सोडून वैकुंठाला गेले.

तुकोबारायांचा वैकुंठगमन दिवस

इ.स. १६०९ मध्ये माघ शुद्ध पंचमी, वसंतपंचम ीला जग्दगुरु संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांचा जन्म झाला. इ.स.१६५० साली फाल्गुन कृष्ण द्वितीयेला अवघ्या वयाच्या ४१ व्या वर्षी तुकोबा महाराज भगवान पंढरीरायांच्या साक्षीने सदेद वैकुंठाला गेले, असे म्हटले जाते.

पान 1 वरून पुढे...

## नागरगोजे आत्महत्या....

मारणार आहेत, असे त्यांनी म्हटले. आता यावरून सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी धनंजय नागरगोजे यांच्या आत्महत्येप्रकरणी सहाही जणांवर गुन्हे दाखल करा, अशी मागणी केली आहे.

दरम्यान सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी एक्सवर पोस्ट करत म्हटलंय की, आज पुन्हा एकदा डोकं सुन्न झालं. धनंजय नागरगोजे काहीच न विचार करता गेले? ३ वर्षाच्या त्यांच्या चिमुकलीला सोडून. किती निर्दयी आहेत ही माणसं हे विक्रम बाबुराव मुंडे, विजयकांत विक्रम मुंडे, अतूल विक्रम मुंडे, उमेश रमेश मुंडे, ज्ञानेश्वर राजेभाऊ मुरकुटे, गोविंद (अमोल) नवनाथ आव्हाड, थर्ड ग्रेड माणस आहेत ही. १८ वर्ष पगार दिला नाही आणि पगार मागितला म्हणून हाल केले? पण हे एकटेच कारणीभूत आहेत का? शासन काय करतंय? मी त्यांचे फेसबुक पाहिले. ८ फेब्रुवारी ते २६ फेब्रुवारी २०२३ ला आझाद मैदानात आंदोलन केले. उपयोग काय झाला? सगळ्यात वर्शीर्शीळपस जागा आहे ती. असंख्य लोक येतात आंदोलनात सहभागी होतात, नारे देतात, आक्रोश करतात आणि आल्या पावली परत जातात. मग आज धनंजय नागरगोजेने प्राण दिला ह्याला सरकार जबाबदार नाही का? सामान्य माणसाने कसं लढायचं? ऐका त्यांची व्यथा, असे त्यांनी म्हटले आहे. याबाबत दमानिया यांनी पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांच्याशी चर्चा केली मात्र कोणीच तक्रार करत नसल्याने गुन्हा दाखल झालेला नाही असे त्यांनी सांगितलं. आपण पुन्हा उद्या त्यांच्याशी चर्चा करणार असल्याचे दमानिया यांनी म्हटले आहे.

## प्रेम प्रकरणातून...

बनसोडेने म्हटलं की, 'माझा भाऊ विकास बनसोडे २०१८ साली पिंपरी घुमरीमध्ये भाऊसाहेब क्षीरसागरकडे ट्रक ड्रायव्हर म्हणून काम करत होता. तो २० फेब्रुवारी २०२५ रोजी जालन्याला घरी आला. त्यानंतर १२ मार्चला पुन्हा होळीसाठी मालकाच्या बोलावण्यावरून आष्टीला गेला. आष्टीला जाताना सांगून गेला'.'१५ मार्च रोजी क्षीरसागरचा दुपारी फोन आला. त्याने आई-वडील आणि नातेवाईकांना घेऊन ये. त्यानंतर विकासला घेऊन जा असे सांगितले. विकासला घेऊन जायचे नसल्यास आमच्या पद्धतीने त्याचे काय करायचे ते करतो. काय झालं विचारल्यावर, आष्टीत आल्यावर सांगतो, असं क्षीरसागरने सांगितलं. त्यानंतर विकाससोबत काम करणार्या मित्रांना फोन विचारलं. त्यावेळी त्याने मी आणि विकास दोघे मालकाच्या घरी अससल्याचे सांगितले,असे आकाशने सांगितले. 'विकास आणि भाऊसाहेबाच्या मुलीचे प्रेमसंबंध असल्याच्या संशयावरून दोघांना घरासमोरील पत्राच्या शेडमध्ये ठेवल्याचे विकासच्या मित्राने सांगितले. स्वाती भाऊसाहेब क्षीरसागर, सुवर्णा बाबासाहेब क्षीरसागर, संकेत भाऊसाहेब क्षीरसागर, संभाजी झांबरे, सचिन भवर, भाऊसाहेब क्षीरसागर यांचे मोठे दाजी, सुशांत शिंदे, बापुराव शिंदे यांनी दोघांना बांधून ठेवलं. त्यांना दोरी आणि वायरच्या सहाय्याने बेदम म ारहाण केली. महिलांनी शिवीगाळ केली, असेही त्याने जबाबात पुढे सांगितले. 'आम्ही भाऊसाहेबाच्या घरी गेलो. त्यावेळी विकासच्या पोटात दुखत आहे. त्याला सरकारी दवाखान्यात दाखल केल्याचं सांगण्यात आल. त्यानंतर आम्ही रुग्णालयात गेलो. आम्ही भाऊसाहेबाला फोन केला. त्यावेळी त्याचा मोबाईल बंद होता. त्यानंतर भाऊसाहेबचा भाऊ बाबासाहेबाला कॉल केला. त्यावेळी विकासला शासकीय रुग्णालयात टाकल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही पोलिसांत धाव घेतली. त्यानंतर बाबासाहेबाने फोन बंद केला, असे आकाशने पुढे सांगितले.'मी सरकारी रुग्णालयातील डॉक्टरांना विचारले. त्यावेळी डॉक्टर म्हणाले, गाडीमध्ये २ जण येऊन विकासला दवाखान्यात दाखल करून नाव गाव न सांगता लगेच निघून गेले. डॉक्टरांनी विकासची तपासणी केली, त्यावेळी त्यांनी विकासला मृत घोषित केले., असे आकाशने सांगितले.

## सुरेश धस खोक्याच्या...

आमदार सुरेश धस यांनी म्हटले. आमदार धस यांनी आज सतिश उर्फ खोक्याच्या पाडलेल्या घरी भेट दिली. मी वनविभाग कायद्यानुसार हे कोणत्या कायद्यानुसार केले याची माहिती घेणार आहे, हे घर साठ वर्षांपूर्वीच आहे. हे कोणत्या नियमात बसते, असा सवालही आमदार धस यांनी उपस्थित केला आहे. सतीश भोसले याच्यावर गुन्हा दाखल झाला होता, बुलढाणा जिल्ह्यातील व्यक्ती मारहाणीवरून तक्रार दाखल केली होती, पण याचे घर पाडण्याचे कारण काय? कुणाच्या दबावाखाली केले हेच आम्ही बघत आहोत, असेही धस यांनी म्हटले. जिल्ह्यातील जुने व्हिडिओ काढायचे आणि कोणाच्याही बदनाम्या करायचा असा प्रकार सुरू आहे, देशमुख प्रकरण वळवण्यासाठी ही सुरू असल्याचेही आमदार धस यांनी यावेळी म्हटले. दरम्यान, यावेळी सतिश भोसलेची पत्नी व आई यांच्यासोबत संवाद साधत आमदार सुरेश धस यांनी त्यांची कैफीयत ऐकून घेतली. तसेच, वन विभागाला इशाराही दिला आहे.

## अजित दादा बीड....

माजलगाव तालुक्यातील वाढत्या मटक्यावर पोलिसांनी कार्यवाही करावी अशी मागणी माजलगाव पत्रकारांच्या वतीने पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांच्याकडे करण्यात आली होती सर्व वर्तमानपत्रात बातम्या प्रकाशित झाल्या आणि माजलगाव पोलिसांनी कार्यवाहीचे नाटक केले एक-दोन मटका बुकी केंद्रावर जाऊन मटका बुकी चालका ऐवजी मटका खेळणाऱ्यावर कारवाई करून मोठा तीर मारल्याचा आव माजलगाव पोलिसांनी आणल्यामुळे माजलगाव पोलीसांची सर्वत्र थू होत असतानाच अवैध धंद्यावाल्याचे मात्र मनोबल वाढले आहे दुप्पट पद्धतीने आणि खुल्या मटका वाढला आहे अवैध धंद्या वाल्याकडून माजलगाव शहर व ग्रामिण पोलिसांना मोठ्या प्रमाणात रसद मिळत असल्यामुळे माजलगाव पोलीस अवैध धंद्यावर कार्यवाही करण्यास कुचराई करत आहेत असे सर्व सामान्य जनतेतून बोलले जात आहे पोलीस जनतेचे रक्षक आहेत की अवैध धंदेवाल्यांचे गुलाम हे समजायला तयार नाही माजलगाव तालुक्यातील सर्व सामान्य माणसाची अवैद्य धंदेवाल्याकडून लूट होत आहे आणि माजलगाव पोलीस उघड्या डोळ्याने पाहत आहे याला काय म्हणावे ? अवैध धंद्याच्या माध्यमातून कायदा अन् सुव्यवस्थेचे तिन तेरा वाजत आहेत याची अनेक उदाहरणे आहेत तरीही माजलगाव पोलीस बोध घेत नाहीत मस्साजोग अवैध खंडणी प्रकरण, अवैध वाळू प्रकरण, अवैध गुटखा प्रकरण, आणि अवैद्य मटका प्रकरणात अनेक दहशतीचे प्रकार पाहायला मिळतात यातून खून, मारामाऱ्या करतात अगोदरच जिल्ह्याची अति संवेदनशील परिस्थिती असताना पत्रकारांसह लोक तक्रारी करत असताना माजलगाव पोलीस मात्र या बाबीकडे डोळे झाक करत असल्याने माजलगाव तालुक्यातील जनतेच्या आक्रोशाला सामोरे जावे लागणार आहे हे मात्र निश्चित आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com